# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र १००

दिनांक- १४/०४/२०२१

## कलेक्शन एजंन्ट याचेवर दरोडा टाकुन लुटणा-या आरोपीत यांना पकडण्यात गुन्हे शाखा, कक्ष-3 विरार यांना यश.

दिनांक ०७/०४/२०२१ रोजी दुपारी ०१:४० वा चे सुमारास फिर्यादी श्री. संतोष रामशंकर पांडे, वय-३१वर्षे, व्यवसाय-सेल्समॅन, राहणार-गाळा नं-४, नेविनाथ बिल्डींग, आचोळे रोड, नालासोपारा पुर्व, ता.वसई, जि.पालघर हे कामण, चिंचोटी, नायगाव परीसरातील मनिट्रान्सपर व मोबाईल रिचार्ज दुकाना मधुन पैश्याचे कलेक्शन करुन राजवली येथील, गो आश्रमच्या पुढे नाल्या जवळ चिंचेच्या झाडा समोरुन रस्त्यावरुन जात असतांना अनोळखी चार इसमांनी फिर्यादीचे मोटार सायकलला धक्का मारुन फिर्यादी यास रस्त्यावर खाली पाडुन शिवीगाळी व दमदाटी करुन लाथाबुक्याने मारहाण करुन १,७८,९००/- रु किंमतीचे रोख रक्कम व बॅग फिर्यादी याचेकडुन जबरदस्तीने हिसकावुन चोरी करुन नेली म्हणुन दिनांक ०८/०४/२०२१ रोजी वालीव पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक ३७६/२०२१ भा.द.वि.स कलम ३९४, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे , मा. सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-३ विरार चे पोलीस पथकाने गुन्हयाचे तांत्रिक विश्लेषन व गुप्त बातमीदार यांचेकडून मिळालेल्या माहीतीच्याआधारे कुशलतेने तपास करुन सदर गुन्हयात ७ आरोपीत निष्पन्न केले आहेत.

आरोपीत नामे- १) सांभा ऊर्फ पिंन्टु दुधनाथ राजभर वय- ३० वर्षे, रा. रुम नंबर ४, दिपक चौधरी याची चाळ, लशविर मंदीरा जवळ, पेट्रोल पंपाच्या मागे, संतोष भुवन नालासोपारा पुर्व २) रोहीत अमरकांत झा वय- २७ वर्षे रा. दुर्गा समिती चाळ, रुम नंबर ३, गौराईपाडा, संतोषभुवन, नालासोपारा पुर्व. ३) रूधरेश दिलीप सावंत वय- २३ वर्षे, रा. २०८, साई यश संकल्प बिल्डींग, सहकार नगर, विरार पुर्व, ता. वसई, जि. पालघर. ४) लक्की ऊर्फ सय्यद फिरोज खान, वय- २२ वर्षे, रा. रुम ४५५४, सुभाष यादव चाळ, नागेश्वर मंदीराजवळ, नित्यानंद हॉटेलच्या पाठीमागे, गोराईपाडा, नालासोपारा पुर्व. ५) अनिल सोनह विश्वकर्मा वय- २४ वर्षे, रा. रुम नबर ६ जय मॉ दुर्गा वेलफेअ सोसायटी, यशवंत नगर, गौराईपाडा नाका, नालासोपारा पुर्व६) सिध्दार्थ प्रमोद सिंग वय- २७ वर्षो, रा. रुम नंबर १०४, ए विंग, रियल होम, महेश पार्क, टाकी रोड अंबावाडी, नालासोपारा पुर्व, ता. वसई, यांना ताब्यात घेवुन सदर गुन्हा उघडकीस आणला आहे.

नमुद आरोपीत हे पुढील कारवाई करीता वालीव पोलीस ठाणे येथे वर्ग करण्यात आलेले आहेत.

वरील कामगिरी श्री. डॉ. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त सो., (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा.पोलीस आयुक्त सो., (गुन्हे), मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि/ प्रमोद बडाख, पोउपनिरी/ उमेश भागवत, सफौ/ अनिल वेळे, पो.हवा/ अशोक पाटील, पो.ना/ मनोज चव्हाण, पो.ना/ प्रदीप टक्के, पो.ना/ मुकेश तटकरे, पो.ना./सागर बारवकर, पो.ना/ मनोज सकपाळ, पो.शि/ अश्विन पाटील, सर्व नेम- गुन्हे शाखा, यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.

Scanned with CamScanner